महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य इन्स्टिटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अॅण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी, पुणे
(महाराष्ट्र शासनाची स्वयत्त संस्था)
४१२/सी, के.एम.मुन्शी मार्ग, शिवाजीनगर, पुणे ४११०१६
फोन : ०२०–२५६७७१८९
Web: www.msihmctpune.org.in
Email: principal.msihmcpune@dtemaharashtra.gov.in

## निविदा चौकशी पत्र

जा.क्र.मराहॉमॅकेटेपु/भांडार/2024–25/580 दिनांक: 09/8/2024

प्रति,
मे. ..............................................................................
..............................................................................

**विषय: Customized MIS Software development दरपत्रकाबाबत...**

महोदय,

सदर संस्था शासकीय संस्था असून संस्थेमध्ये हॉटेल मॅनेजमेंट व्यवस्थापन या विषयाचे संपूर्ण प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात येते. त्यासाठी संस्थेस **Customized MIS Software** विकसित करावयाचे आहे, तरी याबाबतचे आपले दरपत्रक दि. 20/08/2024 सायंकाळी 05:00 वाजेपर्यंत सीलबंद पाकिटात त्यावर **Customized MIS Software development दरपत्रक** असे नमुद करून संस्थेच्या कार्यालयात पोहोच करावेत.

### नियम व अटी

1. दरपत्रक या कार्यालयामध्ये वस्तु/सेवा पुरविण्याबाबतचे असावे, त्यामध्ये सर्वप्रकारच्या करांचा स्पष्ट उल्लेख असावा व दर सर्वकर समाविष्ट असावा.
2. दरपत्रकात नमुद केलेले दर कमीत कमी 30 दिवसांकरीता वैध असावेत.
3. पुरवठा आदेश प्राप्त झाल्यानंतर दिलेल्या कालावधीत पुरवठा/ सेवा देणे बंधनकारक आहे.
4. MIS संगणक प्रणाली पूर्णपणे विकसित व कार्यान्वित झाल्यानंतरच व पुरविलेल्या सेवा समाधानकारक असल्यानंतरच देयकाची पूर्ण रक्कम अदा केली जाईल, रकमेचा काही भाग आधी व काही नंतर दिला जाणार नाही.
5. कोणत्याही अथवा सर्व निविदा नाकारण्याचा, सर्व प्रकिया पूर्णपणे किंवा निविदा स्विकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा निर्णय अधिकार कार्यालयाकडे राहील.
6. विलंबाने प्राप्त झालेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.
7. सदर MIS संगणक प्रणाली विहित मुदतीत कालबध्द रितीने विकसित करणे व कार्यान्वित करणे बंधनकारक राहील.
8. प्रणालीद्वारे परिक्षा विभागाची व विद्यार्थ्यांच्या परिक्षेच्या (Odd Semester 2024-25 and Even Semester 2024-25) निकालाबाबतची सर्व कामे पार पडणे अपेक्षित असुन सदर कामाबाबतची यादी सोबत जोडली आहे. अधिक माहितीसाठी या संस्थेशी संपर्क साधावा.
9. सदर विकसित केलेल्या प्रणालीचे, तसेच परिक्षेसंबंधी व निकालासंबंधीचा डेटाबाबतचे सर्व हक्क व मालकी या संस्थेची राहील.
10. वरील संबंधीत डेटाच्या गोपनियतेची पुर्ण जबाबदारी विकसकाची राहील.
11. सदर प्रणाली विकसनाबाबत संस्थेस नियम व अटींचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

प्रत :
1. नोटीस बोर्ड, एमएसआयएचएमसीटी, पुणे (पदविका)
2. एमएसआयएचएमसीटी, पुणे संकेतस्थळ
3. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे संकेतस्थळ

प्राचार्य
महाराष्ट्र राज्य इन्स्टीट्युट
ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अॅण्ड
केटरींग टेक्नॉलॉजी,
शिवाजीनगर, पुणे-४११०१६